**साक्षीदार प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सावंतवाडी यांच्या न्यायालयातून हजर. उभय पक्षांनी साक्षीदाराच्या ओळखीबाबत कुठलाही वाद नसल्याबाबत कळविले.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ ची साक्ष**

**निशाणी क्र. २२**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – शिवराज अशोक झांजुर्णे

माझे वय – ३७ वर्षे,

व्यवसाय – पोलीस उप निरिक्षक,

रा.ने. – बांदा पोलीस स्टेशन

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती यु.आर.हेरवाडे यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

०१. दि. १४/१२/२०२३ रोजी माझी नेमणूक मालवण पोलीस स्टेशन येथे होती. सदर दिवशी माझ्यासोबत सोनवलकर, पेडणेकर, घागरे, जाधव व चालक पाटील असे हजर होते. सदर दिवशी मला व माझ्या वरील सहकाऱ्यांना मालवण पोलीस निरिक्षक यांनी मसुरा दुरक्षेत्र येथे जाण्यासाठी आदेशित केले होते. त्यानंतर आम्ही सरकारी वाहन क्र. एमएच–१२–एसक्यू–२०२८ ने मसुरा दुरक्षेत्र येथे १७.३० वा. गेलो. आम्ही मसुरा आऊटपोस्ट येथे पोहचल्यानंतर त्या ठिकाणी पोलीस उपविभागीय अधिकारी, कणकवली घनःश्याम आढाव, मालवण पोलीस स्टेशन पोलीस निरिक्षक कोल्हे, ए.पी.आय जाधव, पोहेकॉ नाईक, पोलीस नाईक ढोले हे सुध्दा हजर होते. त्या ठिकाणी एसडीपीओ ऑफिस कणकवली मधील जंगले, पोहेकॉ कडूलकर व गवाणकर हे सुध्दा हजर होते. उपविभागीय अधिकारी आढाव यांनी कालावल खाडी नदीपात्रामध्ये अवैध वाळू उपसा होत असल्याने त्या ठिकाणी कारवाई करण्यासाठी आदेशित केले. आम्ही कारवाईसाठी १८.०५ वा. दोन सरकारी वाहन व एका खाजगी वाहनाने निघालो होतो. आम्ही कालावल खाडीकडे जाण्यासाठी मसुरे येथून निघून कालावल खाडीकडे चिंदर भटवाडीतील चिंदर फाटा येथील दुधडेअरीच्या पुढे भगवंतगडाच्या दिशेने जात असताना भगवंतगड ते आचरा दिशेने एक डंपर येताना दिसला. मी सदर डंपरला थांबण्याचा इशारा केला असता तो डंपर न थांबता पुढे निघून गेला त्यामुळे आम्ही सदर

वाहनाचा पाठलाग केला. आम्ही सदर डंपरला चिंदर भटवाडी येथील चिंदर फाटा येथील दुध डेअरीजवळ १८.४७ वा. पकडले. पकडलेल्या डंपरचा क्रमांक एमएच–०७–सी–५५४५ होता. सदर डंपरची तपासणी केली असता त्यामध्ये आम्हाला वाळू मिळून आली होती. डंपर चालकाला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव समीर श्रीरामसुंदर मालोंडकर असे सांगितले.

कनेक्टीव्हीटी समस्येमुळे साक्षीदाराचा सरतपास पुर्ण होवू शकला नाही. त्यामुळे साक्षीदाराचा सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो.

श्रवणोत्तर स्वीकृत

महेश रा. देवकते
दिनांक : ०६/०३/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण.